# काश्मिरी गुलाब

ना. सी. फडके

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**काश्मिरी गुलाब : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ १५०/-

# काश्मिरी गुलाब

# अमलकान्ताची हकीगत

## १

सिंध हैदराबाद ते मारवाड जंक्शनपर्यंतचा रेल्वेचा प्रवास म्हणजे एक जबरदस्त शिक्षा आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत तर कांही विचारूच नका. डब्याच्या खिडक्या बंद ठेवाव्या तर आंत दोन पंख्याची सारखी घरघर चालूं असूनही जीव कासावीस होतो. उलट खिडक्या उघडाव्या, तर बाहेरच्या प्रदेशांतील करड्या रंगाच्या वाळूचे लोट आंत येऊं लागतात. त्यांचा त्रास सहन करूनही बाहेरच्या सृष्टीचा देखावा पाहाण्याची कल्पना तर मनांत येणें शक्यच नाहीं. कारण, रुक्ष वालुकामय प्रदेशाखेरीज दुसरें कांहींच दिसत नाही. फार तर काटेरी झुडुपांचा एखादा थवा, किंवा उंटांची लांबट रांग, किंवा दहा-पाच मातीच्या माळवदी घरांनीं बनलेले एखादे खेडे दृष्टीपुढून मधूनच एकदम सरकतें. एखादे स्टेशन लागेल तेव्हांच काय ती डब्याच्या खिडक्या उघडण्याची हौस भागवून घ्यावयाची. स्टेशनवरसुद्धा कांही मोठा रम्य देखवा दिसतो असे नव्हे. कणसासारखे भाजलेले मांसाचे तुकडे विकणारे मुसलमान व त्यांच्याभोवती जमा होणारे गाडींतील उतारू यांखेरीज तेथील त्या देखाव्यांत दुसऱ्या आल्हादकारक गोष्टी क्वचितच आढळतात. केव्हा एकदा हा टापू ओलांडून आपण पुढें जातों असे प्रवाशाला होऊन जातें.

निदान मला तरी त्या दिवशीं झालें होतें.

मुंबईहून कराचीला जावयास निघतांना बरोबर घेतलेली सारी इंग्रजी मासिकें मी केव्हाच संपवून टाकलीं होतीं. कराचीस ज्यांच्या घरीं मी एक दिवसापुरता उतरलों होतों, त्यांच्या घरचीं दोन मराठी मासिकें आज तेथून निघतांना त्यांच्याकडून मिळालीं होती. तींही खलास झालीं होतीं. त्यांतली सगळ्या राशींची मासिक भविष्यें मला मुखोद्‌गत व्हायची वेळ आली होती; आणि सगळ्या स्टुडिओंतील छायाप्रकाश माझ्या दृष्टीला जवळजवळ पाठ झाले होते. वेळ कसा घालवावा तें मला अगदी समजेना. अखेर त्या मराठी मासिकांतीलच ज्या एकांत इंग्रजी क्रॉसवर्ड दिले होते तें नाइलाजानें पुन्हा हातीं घेऊन त्या मासिकाच्या कोड्याचा म्हणजे मासिकांत छापलेल्या कोड्याचा-उलगडा करू लागलों.

कोठल्याशा एका स्टेशनवर गाडी बराच वेळ थांबली. पण मी खालीं उतरलों नाही, किंवा खिडकीबाहेरही फारसें पाहिलें नाही. त्या कोड्यांत छपाईच्या एकदोन चुका झालेल्या असल्यामुळें त्या ओळखून काढणें हाही त्या कोड्याचा एक भागच झाला होता, व मी त्या कोड्यात चांगलाच गुरफटला गेलों होतों. खिडकींतून बाहेर पाहण्याची मला फारशी इच्छा नव्हती.

पण तितक्यात प्लॅटफॉर्मवरून चालणारें कोणी तरी माणूस माझ्या खिडकीजवळ येऊन थांबलेंसें मला वाटले, व माझ्या कानांवर शब्द आले,

'तुमच्या हातांत मराठी मासिक आहे का हो?''

त्या परमुलुखांत मराठी शब्द कानांवर पडण्याची यत्किंचितही अपेक्षा नसल्यामुळे मी एकदम कांहींशा आनंदाने वळून पाहिलें.

प्लॅटफॉर्मवर उभ्या असलेल्या गृहस्थाने पुन्हां विचारलें,

'तुमच्या हातात मराठी पुस्तक आहे काय? मला तें देऊं शकाल?'

मी हसत हसत पुस्तक पुढें केलें, व म्हटलें,

'हो हो, घ्या ना आपण मराठी भाषा बोलणारे दिसतां.'

'होय. मी मूळचा मुंबई-पुण्याकडचाच आहें.'

'मग आता कराचीला असतां वाटतं?'

'नाहीं,.'

'मग कुठें असता?'



हा प्रश्न ऐकताच त्या गृहस्थाची चर्या एकदम पालटली त्याच्या दृष्टीत शोकाकुलता दिसली. त्यानें आपला उजवा पंजा 'गेल्या त्या गोष्टी' असे म्हणतांना माणूस हालवितो त्याप्रमाणें हालविला, व म्हटलें,

'कुठें असतों काय सांगू? आज इथें या गाडीत आहे खरा. पुढे कुठें असणार आहे याची कल्पना नाहीं. आठ दिवसांपूर्वी कुठें होतों त्याची आठवण होण्यापेक्षा जर मृत्यू येईल तर बरं असं वाटतं.'

अखेरचे ते शब्द उच्चारताना त्यानें जो सुस्कारा टाकला, तसा माझ्या जन्मात मी कधी ऐकला नव्हता. तो मला ऐकवला नाही.

मी त्या गृहस्थाला कांहीसें विचारणार होतो इतक्यात गाडी निघू लागली, आणि तो गृहस्थ मी दिलेले मासिक घेऊन 'थँक्स' असें म्हणत नमस्कार करून लगबगीनें दूर झाला.

मी खिडकीवाटे वाकून पाहिलें तो माझ्या डब्यापलीकडच्या तिसऱ्या चवथ्या सेकंड क्लासच्या डब्यांत तो शिरलेला मला दिसला. मग किती वेळ तरी त्या गृहस्थाच्या त्या चमत्कारिक उद्‌गारांचे कोडे मी मनाशी उलगडीत होतों.

पुढच्या स्टेशनवर गाडी थांबतांच तो गृहस्थ माझ्या डब्याशी आला व म्हणाला,

'आमच्या डब्यांत येतां का? जरा गप्पा मारू कीं.'

त्याची विनंति नाकारण्याचे काहीच कारण नव्हते. उलट, त्याच्याबद्दल एक प्रकारची विलक्षण जिज्ञासा माझ्या मनात जागृत झाली होती. म्हणून मी उतरलो व त्याच्याबरोबर गेलों.

त्याच्या मागोमाग डब्यात चढून मी दारांत उभा राहिलो. त्याबरोबर माझ्या मनाची काय अवस्था झाली तें सांगणे फार कठीण आहे. मी चकित झालों, की आनंदित झालो, की गोंधळलो, की या सगळ्याच गोष्टी क्षणार्धात एकदम घडल्या तें मला कधीही सांगता यायचें नाही. मला असेंही वाटलें, की जें मी पहात आहे ते जागेपणी नव्हे तर स्वप्नात!

कारण -

समोर एक अत्यंत लावण्यवती तरुण मुलगी बाकावर कोपऱ्यात बसली होती! तिने जरीची गुलाबी साडी परिधान केली होती. तिचा चेहरा ओझरताच पाहिला.

पण तो पाहताच गुलाबाची ताजी टवटवीत फुले, सरफरचंदाची मोठमोठी लालबुंद मधुर फळें, मंद वायुलहरीवर डोलणाऱ्या वनलतांवरचे फलपुष्पांचे घोंस आपल्या दृष्टीस पडल्यासारखे मला वाटले! असें लावण्य मी जन्मांत पाहिलें नव्हते. अन् तो गृहस्थ त्या मुलीशेजारी बसला व माझा संकोच घालविण्यासाठी 'इथे बसा, इथे या' असें म्हणून त्याने माझा हात धरून मला आपल्याजवळ बसविलें. आपली सिगरेट–केस पुढें करून त्याने विचारलें,

'कराचीस असता काय?'

'नाही, एक दिवसापुताच कराचीस गेले होतों; दोन वर्षे मी इंग्लंडमध्ये अभ्यासासाठी राहिलो आहे–ज्यांनी मला स्कॉलरशिप देऊन पाठवलं ते कराचीचे गृहस्थ फार आजारी आहेत, अशी केबल आली म्हणून केवळ त्यांना भेटायसाठी तातडीनं इकडे निघून आलो.'

'मग आता त्यांचं बरं आहे?'

'हो, आता बरं आहे. उगीच घाबरले होते. आता या शनिवारच्या बोटीनं मी परत इंग्लंडला जाईन.'

'असं? अरेरे! वाटलं होतं तुमचा आमचा हा नवीन परिचय तुम्ही मुंबईत राहणार असाल तर वाढेल कदाचित्.'

'म्हणजे आपण मुंबईत बरेच दिवस राहणार वाटतं?'

'पाहूं या नशिबांत काय काय असेल तें. सध्या सत्यानाश झाला आहे खरा.'

'मगापासून मी पाहतों आहे, आपण कोठल्या तरी संकटांत सापडल्यासारखं बोलत आहांत.'

त्या गृहस्थाने सिगारेटची राख झाडली, हताश झालेल्या माणसाप्रमाणें तोंडाची उघडझांक करून श्वास घेतला, आणि म्हटले,

'होय. माझ्या संकटाचं मी काय वर्णन करूं! आठ दिवसांपूर्वी मी सुखाच्या आणि श्रीमंतीच्या कळसावर होतो. क्वेट्टयाला माझं फार मोठं दुकान होतं. वीस–पंचवीस वर्षांत मी व्यापार इतका वाढविला होता, की महिन्याला चाळीस–पन्नास हजारांची उलाढाल मी करीत होतो. पण धरणीकंपांत सगळंच शहर उलथंपालथं झालं अन् मला तर दुर्दैवानं असा तडाखा दिला की त्यानं आलेल्या मूर्च्छेतून मी



कधी जागा होईन की नाही कुणास ठाऊक! बाजारपेठेतलं माझं दुकान तर पार गडप झालंच, माझ्या मालकीची चार घरंही जळून खाक झालीं, आणखी–'

पुढे बोलण्याच्या आधीच्या त्याच्या डोळ्यांत चटकन् पाणी आले आणि पलीकडे बसलेल्या त्या मुलीने तर मोठ्याने हुंदका देऊन आपल्या जरीच्या साडीच्या पदराने तोंड झाकलें!'

तो पुढें काय सांगणार होता त्याची मला कल्पनाच करता येईना.

आपल्या डोळ्यांचे पाणी पुसून तो गृहस्थ म्हणाला,

'प्राणाहून प्रिय असलेली माझी पत्नी आगीत सापडली, अन्... मेली! बावीस वर्षांपूर्वी मी तिच्याशी लग्न केलं. एका काश्मिरी पंडिताची मुलगी होती ती. तिच्या रुपाचं वर्णनं कवीलासुद्धा करतां यायचं नाहीं. ती माझ्या घरांत आल्यापासून माझी बरकत सारखी वाढू लागली. तिचं नांव मोठ्या हौसेनं मी लक्ष्मी असं ठेवलं. तिच्या सहवासात मी राजासारखा राहात होतो. पुढच्या आयुष्याबद्दल किती सुंदर आणि किती उंच मनोरे आम्ही बांधीत होतो! आम्हांला काय कमी होतं? पैसा वाटेल तेवढा होता, आणखी ही सोन्यासारखी मुलगी होती. माझ्या बायकोला गुलाबाची फार हौस, म्हणून आम्ही हिचं नाव गुलाब असं ठेवलं. शेजारचे सारे लोक हिला म्हणत, 'काश्मिरी गुलाब!' कारण, हिची आई काश्मिरची होती. मी आणि माझी बायको मनाशीं बेत करीत असूं, आता उगीच परदेशांत किती दिवस राह्यचं, सारा व्यापार आवरून एक दिवस आपल्या मुलुखांत जाऊं, आपल्या या सुंदर मुलीला शिकवून शहाणी करूं, अन् म्हातारपणी तिचा गोडगोड संसार पहात आनंदानं डोळे झाकूं. पण आता खलास झालीं ती सारीं स्वप्नं! माझी लक्ष्मी गेली! आता या एका गोरिवाण्या कोवळ्या जीवाकडे पाहून जगायला पाहिजे. पण, धरणीकंपाच्या त्या कल्लोळाची आठवण झाली, 'लक्ष्मी, तूं कुठें गेलीस!' असा आतल्या आत कोरडा टाहो फोडणारं अंत:करण ठाव सोडून भिरीभिरी हिंडायला लागलं, की वाटतं, कुठें तरी उडी घ्यावी अन् द्यावा जीव! मग हे भयंकर विचार मनांतून घालवायसाठी या बाटलीचा आश्रय करतों. आज आठ दिवसांपूर्वी कधी घेतली नव्हती इतकी घेतली दारू. तुम्ही घ्या की थोडी माझ्याबरोबर. आता संध्याकाळ झाली आहे, तेव्हा हरकत नाही.'

त्या वेळी गाडी खूपच वेगाने चालली होती. भुंग्यांच्या थव्याचा भास उत्पन्न करणाऱ्या डोक्यावरच्या पंख्यांतून किंचित्शी थंड हवा मिळू लागली होती. बंद केलेल्या खिडक्यांच्या फटींतून आत आलेला प्रकाश अंधुक झाला होता.

तितक्यात गाडीतले दिवेही लागले.

मद्यपानास ती वेळ खरोखरच अनुकूल होती.

पण, मी त्या गृहस्थाच्या सूचनेला मान्यता देणार इतक्यात माझी दृष्टि त्याच्या पलीकडे कोपऱ्यांत बसलेल्या त्या मुलीकडे गेली, व बापानें हातीं घेतलेल्या बाटलीकडे व ग्लासाकडे ती अतिशय भयभीत नजरेनें पहात आहे असें मला वाटलें. जणूं तिच्या पित्याच्या हातांत एखादें भयंकर घातकी शस्त्र तिला दिसत होते. तिच्या प्रफुल्ल गालांवरचा गुलाबी रंग किंचित् कमी झाला होता; एरवीं चांचल्याची क्रीडा करणारे तेज:पुंज टपोरे डोळे बापाच्या हातातील त्या बाटलीवर स्थिर झाले होते, श्वास किंचित् आंवरून धरल्यामुळें नासिकाग्रांच्या पाकळ्या फुगल्या होत्या, आणि एकमेकांपासून किंचित् दूर झालेल्या लाल लाल ओठांमधून मोत्याच्या दाण्यांना लाजविणारी शुभ्र दंतपंक्ति किंचित् उघडी पडली होती.

मी तिच्याकडे टक लावून पहायला आणि तिनें दृष्टि वर करून पहायला एकच गाठ पडली.

त्या कटाक्षांत केवढा तरी अर्थ भरला होता!

मी त्या गृहस्थास म्हटले,

'नको. मला नको मद्य. अन् तुम्ही तरी कशाला घेतां असं सारखं?'

'कशाला घेतों?' असें मला विचारून त्या गृहस्थाने हातांतला ग्लास किंचित् वर करून त्याकडे पाहिले व पुढें म्हटलें, 'कशाला तें माझं मलाच कळत नाही.'

मी त्याच्याकडे पहाण्याऐवजी गुलाबकडे नजर लावली होतीं हे त्याच्या ध्यानांत येताच तो म्हणाला,

'गुलाब, बेटा तुला भीति वाटते? वेडी कातूं? या मद्यानं माझी नजर कितीहि किलकिली झाली तरी आईवांचून दीनवाण्या पाडसासारखी दिसणारी तूं माझ्या डोळ्यांना अगदी स्पष्ट दिसत राहशील. तुझ्यासाठी मला आता जगलं पाहिजे याचा विसर मला क्षणभर तरी पडेल कां बरं? या ग्लासांत मला ज्या आठवणी बुडवायच्या आहे त्या अगदी निराळ्या आहेत. अगणित पैसा आणखी अलोट प्रेम यांचं जे



भांडारच्या भांडार दुर्दैवानं माझ्या हातून लुटून नेलं त्याच्या आठवणी मला सारख्या भेडसावतात. त्या विसरायसाठीं मी हें घेतों. बेटा, भिऊं नकोस.'

असें म्हणून त्याने एखाद्या अर्भकाच्या हनुवटीला लावावा तसा तिंच्या हनुवटीला हात लावला, व तिच्या केसांवरून बोटें अलगद फिरविलीं.

गुलाबनें झटकन् आपल्या बापाचा हात धरला व त्यावर आपलें कपाळ टेकलें.

त्या रात्री मला झोप कशी ती आली नाही,. एकीकडे आत मुंबईस पोचताच सारी कामें आवरून बोट गाठण्यासाठी कशी धडपड केली पाहिजे याचे विचार मी करीत होतो, व दुसरीकडे पलीकडच्या डब्यातील तो गृहस्थ, काश्मिरी सौंदर्याची अलौकिक प्रतिमा अशी त्याची ती लेक, त्याने सांगितलेल्या त्याच्या असामान्य संसारसुखाच्या हकीगती याबद्दलचे विचार पुन: पुन्हा मनांत घोळत रहात होते. मध्येच क्षण अर्धा क्षण डोळ्याला डोळा लागे, पण तितक्यांत बापाच्या हातातील ग्लासाकडे भेदरलेल्या दृष्टीने पहाणाऱ्या गुलाबी अनुकंपनीय मोहक मुद्रा डोळ्यापुढें उभी राही, आणि मी दचकून डोळे उघडून वेड्यासारखा डब्याच्या छताकडे पहात राही!

✦✦✦